# महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५

## कलम ४ (१) (ब) मधील १७ बाबींवरील माहिती

## मॅन्युअल क्र. १

### संस्थेचे कार्य व कर्तव्य

**संस्थेचे नांव - जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव**

### संस्थेचे कार्य :

१. जिल्ह्यातील संपुर्ण महसुल विभाग व पोलीस विभाग या दोन्ही यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखणे.

२. महाराष्ट्र राज्याचे जिल्हा पातळीवरील प्रशासन प्रमुख म्हणून काम पाहणे.

३. जिल्ह्यामध्ये जमिनीचे रेकॉर्ड अद्यावत स्वरुपात ठेवणे.

४. जिल्ह्यातील सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणेमध्ये समन्वय राखणे.

५. शासन आणि जनता यांच्यामध्ये गावपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत दुवा म्हणून काम पाहणे.

# संस्थेचे कर्तव्य

१. जिल्ह्यातील संपुर्ण महसुल विभाग व पोलीस विभाग या दोन्ही यंत्रणेवर नियंत्रण ठेवतात व जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याची अंमलबजावणी करण्यात येते.

२. महाराष्ट्र राज्याचे जिल्हा पातळीवरील प्रशासन प्रमुख म्हणून काम पाहतात.

३. जिल्ह्यामध्ये जमिनीचे रेकार्ड अद्यावत स्वरुपात ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

४. जिल्ह्यातील सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणेमध्ये समन्वय राखण्याबाबत वेळोवेळी बैठका घेण्यात येऊन शासन पातळीपर्यंत दुवा म्हणून काम पाहणे.

५. शासन आणि जनता यांच्यामध्ये गावपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत दुवा म्हणून काम पाहणे.

६. तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे व अंमलात कायद्या प्रमाणे केले जातात.

(II)

महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग परिपत्रक क्रमांक. एस.१४/ २६१३/ प्र.क्र.२०९(२)ई-३ मंत्रालय, मुंबई ४०००३२,दि. ३० एप्रिल, १९९२ अन्वये, जिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले विषय:-

**प्रपत्र - अ**

## जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपुर्द करावयाचे विषय

१. जिल्हा नियोजन आणि दोन कोटींचा कार्यक्रम

२. रोजगार हमी योजना, ग्रामिण भूमिहिनांसाठी रोजगार हमी कार्यक्रम, (जवाहर योजना) आणि इतर रोजगार कार्यक्रम.

३. २० कलमी कार्यक्रमांचे कार्यान्वयन (मुख्यत्वेकरुन अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आलेल्या बाबी वगळता)

४. कायदा व सुव्यवस्था

५. प्रकल्प बाधीत व्यक्तिचे पुनर्वसन.

६. औद्योगिक विकास जिल्हा औद्योगिक केंद्र विषयक बाबींसह

७. नैसर्गिक आपत्ती आणि मदतकार्य.

८. महानगरपालिका हद्दीतील आणि अ वर्ग नगरपालिका हद्दीतील जमिनीचे व्यवस्थापन.

९. शासकीय वसुली.

१०. गौण खनिज व त्याविषयक बाबी.

११. दारुबंदी आणि उत्पादन शुल्कविषयक बाबी.

१२. सार्वत्रिक निवडणूक विषयक बाबी.

१३. दशवार्षिक जनगणना.

१४. जिल्हा पातळीवरील सर्व साधारण समन्वये

१५. पतपुरवठा नियोजन आणि त्या संबंधित इतर बाबी.

१६. आरोग्यविषयक कार्यक्रम.

१७. शेती उत्पादन कार्यक्रम.

१८. अल्पबचत

१९. तक्रार निवारण, राज शिष्टाचार, अतिमहत्वाच्या व्यक्तिचे दौरे, राष्ट्रीय कार्यक्रम इत्यादी.

२०. उपजिल्हाधिकारी, तहसिलदार आणि नायब तहसिलदार यांच्या आस्थापना विषयक बाबी.

२१. रचना व कार्यपध्दती, कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण आणि दुय्यम कार्यालयांची तपासणी.

२२. खरेदी सारख्या वित्तीय बाबी, जिथे विभागप्रमुख म्हणुन जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकराचा वापर करावयाचा आहे.

२३. नगरपालिका प्रशासन.

२४. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या विषयीच्या सर्व बाबी.

२५. विनिर्दिष्ट सहकारी संस्था विषयक सर्व बाबी.

२६. वरील नमुद केलेल्या विषयाबाबत सर्व समित्यांच्या बैठका घेणे.

२७. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व समाजातील इतर दुर्बल घटकांवरील अत्याचारांचा प्रतिबंध करणे आणि बाधित व्यक्तिंच्या पुर्नवसनाविषयी योग्य ती कार्यवाही सुरु करणे.

२८. अव्वल कारकुन, मंडळ निरीक्षक, कनिष्ठ लिपीक, तलाठी, शिपाई यांच्या आस्थापना विषयक बाबी.

२९. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे विनिर्दिष्टपुर्वक देण्यांत न आलेले इतर कोणतेही विषय.

महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग परिपत्रक क्रमांक. एस.१४ /२६१३/ प्र.क्र.२०९(२)ई-३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दि. ३० एप्रिल, १९९२ अन्वये, जिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले विषय :-

## प्रपत्र - ब

## अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपुर्द करावयाचे विषय

१. अन्न व नागरी पुरवठा विषयक बाबी.

२. करमणुक कर व तद्नुषंगिक बाबी.

३. अत्यंत तातडीने विहिरी बांधण्याविषयीच्या (विशेष योजनेचे कार्यान्वय व संजय गांधी निराधार अनुदान योजना इत्यादी.

४. जमाबंदी (बिनशेती आरकणीसह)

५. भूमि अभिलेख सर्वेक्षण आणि जमाबंदी (तलाठी आणि मंडळ निरीक्षक यांचे मार्फत महसूली गांव दप्तरांची परिक्षा इत्यादीसह)

६. कमाल जमिन धारणा, कुळवहिवाट, आदिवासींनी जमिन परत करणे इत्यादी जमिन सुधार विधान विषयक कार्यान्वियन.

७. किमान वेतन रोजगार कायद्याचे कार्यान्वियन.

८. वेठबिगार व्यवस्था निर्मुलन कायद्याचे कार्यान्वयन.

९. मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाखालील निवडणुकीसह ग्रामपंचायत विषयक सर्व बाबी.

१०. तगाई,बांध बंदिस्ती आणि इतर शासकीय वसुली.

११. निखात निधी अधिनियम आणि तद् विषयक बाबी.

१२. मुद्रांक अधिनियम व त्या विषयाच्या इतर बाबी.

१३. नोंदणी अधिनियम व त्या विषयाच्या इतर बाबी.

१४. पिक अंदाज सर्वेक्षण पिकाचे पुर्वानुमान करणे पैसेवारी व कृषि गणना इत्यादी.

१५. अंदाजपत्रक (कार्यक्रम अंदाजपत्रकासह) आणि अंतर्गत लेखा परीक्षा.

१६. दुय्यम कार्यालयाची तपासणी (हे काम जिल्हाधिऱ्यासह)

१७. कर्जमुक्ती कायदा.

१८. निर्वासितांची संपत्ती अधिनियम.

१९. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता व इतर अधिनियम खालील अपिले.

२०. शासकिय मुद्रणालयाकडून निरनिराळे नमुने, लेखनसामुग्री, छापिल साहित्य इत्यादींचा पुरवठा

२१. वर नमुद करण्यांत आलेल्या विषयाबाबतच्या सर्व बैठका.

२२. आयुक्त / शासन यांनी सुपुर्द केलेले इतर कोणतेही विषय.

महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग परिपत्रक क्रमांक.एस.१४ /३६१३/ प्र.क्र.२०९(२)ई-३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. २६ जुलै, १९९३ अन्वये, जिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले विषयः-

## प्रपत्र - क

## जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपुर्द करावयाचे विषय

१. ब व क वर्ग नगरपरिषदा हद्दीतील व ग्रामिण भागातील जमिनींचे व्यवस्थापन.

२. सर्व प्रकारची भूमि संपादन अधिग्रहण (शासन परिपत्रक क्र.१४/३६१३/प्र.क्र.२०९(२)/ई ३, दि.३०/०४/१९९२

सोबतच्या प्रपत्र मधील बाब क्र.९ याव्दारे वगळण्यांत येत आहे.)

३. अ वर्ग नगरपालिका क्षेत्रातील अकृषिक परवानगी.

४. जिल्हा परिषद निवडणुका.

५. पदवीधर शिक्षण मतदार संघाच्या याद्या तयार करणे.

६. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका.

७. शासकिय निवासस्थानाचे वाटप.

८. कोर्ट ऑफ वॉर्डसची कामे.

९. अवर्षन व तद्‌नुषंगिक सर्व बाबी.

१०. आमर्स ॲक्टसाठी परवाने देणे.

११. गणेशोत्सव, दुर्गाउत्सव इ. उत्सवासाठी मनोरंजनाची परवानगी देणे.

१२. नागरी कमाल जमिन मर्यादा व त्या अनुषंगिक बाबी.

१३. प्रकल्पबाधित व्यक्तिचे पुर्नवसन, पुरग्रस्ताचे पुनर्वसन, वेठबिगाराचे पुर्नवसन इ. सर्व पुर्नवसनाची कामे.

१४. सैनिक कल्याण (शासन परिपत्रक क्र.१४/३६१३/प्र.क्र.२०९(२) ई-३, दि.३०/०४/१९९२ सोबतच्या प्रपत्र ब मधील बाब क्र.२१ याव्दारे वगळण्यात येत आहे.)

१५. व्हीडीओ गृहाचा परवाना देणे.

## प्रपत्र - ड

## अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपुर्द करावयाचे विषय

१. गावठाण विस्तार योजना व बेघर भूमिहिनांना जागा व घरकूल बांधमन देणे.

२. सर्व प्रकारची शासकीय वसूली.

३. स्वातंत्र्य सैनिकांची विविध प्रकरणे.

४. वक्फ बोर्ड अधिनियमाखालील प्रकरणे.

५. संजय गांधी योजना

६. विशेष कृती कार्यक्रम.

७. कुटूंब नियोजन कार्यक्रम.

८. भाडे नियंत्रण कायद्यासंबधी पत्र व्यवहार.

९. वर्घा योजना